**CNR No.MHSI01-000312-2020**

**फौजदारी पुनरीक्षण अर्ज क्र. ८/२०२० मधील नि. १३ वरील आदेश.**

१. प्रस्तुतचा अर्ज मूळ अर्जदाराने त्यास या प्रकरणी या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या यादीत नमूद केलेली कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे. सदरचे अर्जास सामनेवालातर्फे फौजदारी कायद्यामध्ये अशी कागदपत्रे पुनरीक्षण अर्जात दाखल करण्याची तरतूद नाही, अशी हरकत नोंदवली आहे.

२. वास्तविक पाहता सदरचा पुनरीक्षण अर्ज नि. १८ वरील आदेशाविरुध्द असून मूळ प्रकरण अन्वीक्षा न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. त्यामुळे अर्जदारास सदरचे दस्तऐवज दाखल करण्यास परवानगी देणे न्याय्य आहे. सबब आदेश.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदाराला या अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे यादीत नमूद केलेली कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी देणेत येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करणेत येत आहे.

सही/-

(शि. व. हांडे)

सत्र न्यायाधीश,

दिनांकः- २०/०९/२०२२

सिंधुदुर्ग-ओरोस